प्राप्त दिनांक – ०४.११.२०२२
नोंदणी दिनांक– ०४.११.२०२२
निकाल दिनांक– ०५.०१.२०२४
कालावधी– ०१ व.०१ म.०१ दि.

## न्यायनिर्णय
## (अधिघोषणा दिनां ०५.०१.२०२४)

प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपीचे वकील यांचा युक्तिवाद ऐकला. संचिकेतील एकंदर कागदपत्रे व पुरावा बघता, खालीलप्रमाणे मुददे माझे विचारार्थ उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्श मुददयांसमोर कारणांसह नोंदविण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्श |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक ०५.०५.२०२२ रोजी ९.०० ते १०.०० वाजताचे सुमारास मौजा बोरी शिवारात भोजराज बालगुंडे यांचे शेताजवळ, सरकारी नाल्याजवळ सेलू, तह. सेलू, जि. वर्धा येथे आरोपी विनापरवाना भटटी लावून दारु गाळतांना आढळून आला आणि त्यादवारे त्यांने कलम ६५ बी महाराष्ट दारुबंदी कायदा अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |
| २ | अभियोग पक्षाने हे सिध्द के आहे काय की, वर नमूद तारिख, वेळ व ठिकाण आरोपीने विनापरवाना, अवैधरित्या दारुचे भटटीवर काम करित होता व त्यादवारे त्याने कलम ६५ सी महाराष्ट दारुबंदी कायदा अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |

| | | |
|---|---|---|
| ३ | अभियोग पक्षाने हे सिध्द के आहे काय की, वर नमूद तारिख, वेळ व ठिकाण आरोपीचे ताब्यातून विनापरवाना विक्रीसाठी ठेवलेली ३० लिटर गावठी मोहा दारु आढळून आली व त्यादवारे त्याने कलम ६५ ई महाराष्ट दारुबंदी कायदा अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |
| ४ | अभियोग पक्षाने हे सिध्द के आहे काय की, वर नमूद तारिख, वेळ व ठिकाणी आरोपीचे ताब्यातुन गुळ मिसळीत रसायन, ४०० लिटर कच्चा मोहा व ३०० लिटर उकळता मोहा तसेच ३ रनींग भटटीचे १५० लिटर मापाचे डम मिळून आले व त्यादवारे त्याने कलम ६५ एफ महाराष्ट दारुबंदी कायदा अंतर्गत गुन्हा केला ? | नाही |
| ५ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

२. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे सिध्द करण्याकरिता केवळ एक साक्षीदार तपासला. पंच साक्षीदार बाबा अजाबराव भोयर याला अभियोग पक्षाने सा.क. १ म्हणून नि. क्र. २ पुढे तपासले. निशानी १ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आलेला आहे. आरोपीविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये आरोपींचे बयाण न नोंदविण्याचे आदेश नि.क्र. १ वर पुढे पारित करण्यात आले. आरोपींनी त्यांच्या बाजुने कोणीही साक्षीदार तपासला नाही.

**मुददा क्र. १ ते ४ चे बाबत –**

३. उपरोक्त मुददे एकाच घटनेशी निगडीत आहेत. पुरावा तसेच विवेचनाची पुनरावृत्ती टाळणेकरिता या मुददयांची कारणमिमांसा एकत्रीत करणे सोईचे व ईस्ट होईल.

सा.क्र. १ पंच बाबा अजाबराव भोयर याने त्याचे पुराव्यात असे सांगितले की, त्याला गुन्हयाबददल काहीही माहिती नाही. त्यासमोर पोलिसांनी काहीही जप्त केले नाही. सदरचा साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करित नसल्याने विद्वान सरकारी अधिवक्ता यांनी सदर साक्षीदारास उलटतपास करण्याची परवानगी मागीतली व उलटतपास घेतला साक्षीदाराने त्यास विचारलेल्या उलटतपासणी सदृष्य प्रश्नांमधून देखिल अभियोग पक्षास कोणताही समर्थनीय पुरावा प्राप्त होवू शकला नाही सबब, पंच साक्षीदाराच्या साक्षीचा फायदा सरकारी पक्षाला मिळू शकला नाही.

४. अभियोग पक्षाचे असे कथन आहे की, मोक्यावरुन जप्त केलेल्या मालापैकी काही माल त्यांनी नमूना म्हणून रासायनिक परिक्षणाकरिता काढून घेतला होता. सदर नमूना रासायनिक परिक्षणाकरिता नागपूर येथील प्रयोग शाळेत पाठविण्यात आले होते. मात्र, अभियोग पक्षास वारंवार संधी देवून देखील त्यांनी तपासी अंमलदार, तथाकथीत रासायनिक परिक्षणाकरिता नमूने वाहून नेणा–या पोलीस कर्मचा–यास व इतर साक्षीदारांना तपासले नाही. सबब, अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र. १ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला. अभिलेखावर रासायनिक पृथ्थकरण अहवाल दाखल करण्यात आलेला असला तरी देखील तो अहवाल आरोपींच्याच ताब्यातून जप्त केलेल्या मालाच्या बाबतीत आहे हे सिध्द होवू शकत नाही. तसेच ते नमूने फिर्यादीच्या कार्यालयातून नागपूर येथील प्रयोग शाळेत कशाप्रकारे व कोणत्या तापमानात नेण्यात आले याबबत संशय कायम राहतो. मुळात पंच साक्षीदार याने त्याचे समक्ष आरोपीच्या ताब्यातून मुददेमाल जप्त करण्यात आल्याचे स्पष्टपणे नाकारले आहे. सबब, रासायनिक पृथ्थकरणाकरिता पाठविलेले नमून दारुचे असल्याचे सिध्द होत असले तरीही ते नमूने आरोपींच्याच ताब्यातून जप्त करण्यात आलेल्या दारुचे होते हे सिध्द करण्यात अभियोग पक्षास अपयश आले आहे. सबब, मुददा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

५. उपरोक्त मुददयांचे निष्कर्श लक्षात घेता आरोपीने गुन्हा केल्याचे बाब सिध्द

झालेली नाही. वरील सर्व विवेचन विचारात घेता. मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१ आरोपी अंकुश सितारामजी सहारे यास फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार महाराष्ट दारुबंदी कायदयाचे कलम ६५ बी,सी,एफ या गुन्हातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२ आरोपीचे बंधपत्र रदद करण्यात येते.

३ आरोपीचे फौजदारी प्रक्रिया कलम ४३७–अ प्रमाणे रु. १५०००/– चा जातमुचलका घेवून त्यास पुर्वी दिलेल्या सुरक्षा राशी रक्कम रुपये २०००/– वर पुढील ६ महिने कालावधीकरिता जामीन कायम करण्यात येते.

४ प्रकरणातील जप्त मुददेमाल ३ रनींग भटटीचे डम, ३ प्लॉस्टीक कॅन व ३ डम अपील कालावधीनंतर जाहीर लिलावाद्वारे विकून येणारी रक्कम सरकारजमा करण्यात यावी व इतर भटटी साहित्य मुल्यहीन असल्याने नष्ट करण्यात यावे तसेच जप्त दारुची योग्य विल्हेवाट करण्याकरिता मा. जिल्हाधीकारी, राज्य उत्पादन शुल्क्, वर्धा यांचेकडे पाठविण्यात यावी.

आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

(एस.डब्ल्यु.शेगोकार)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,
कोर्ट क्र.२, सेलू

सेलू.
दिनांक – ०५.०१.२०२४